# मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
# (म्हाडाचा घटक)

बृहन्मुंबईतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांच्या घरांकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून म्हाडाकडे उपलब्ध झालेल्या २५२१ सदनिकांच्या सोडतीबाबत.

## जाहीर सूचना

बृहन्मुंबईतील ५८ बंद/ आजारी गिरण्यांमधील गिरणी कामगारांच्या घरांकरिता मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून म्हाडाकडे उपलब्ध झालेल्या २५२१ सदनिकांकरिता महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे सोडत काढण्याचे प्रस्तावित आहे. सोडतीकरिता प्राप्त सदनिकांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | सोडत काढावयाच्या सदनिकांचा पत्ता | प्राप्त झालेल्या सदनिका | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|
| १ | मे.टाटा हौसिंग कं.लि.रांजनोळी, जिल्हा ठाणे | १२४४ | ३२० चौ.फुट (१६० चौ.फुटाच्या २ सदनिका) |
| २ | श्री.विनय अगरवाल शिलोटर, रायचूर, जि.रायगड | १०१९ | ३२० चौ.फुट (१६० चौ.फुटाच्या २ सदनिका) |
| ३ | मे. सान्वो व्हिलेज, कोल्हे, ता.पनवेल, जि. रायगड | २५८ | ३२० चौ.फुट (१६० चौ.फुटाच्या २ सदनिका) |
| | **एकूण** | **२५२१** | |

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) यांचेकडून उपलब्ध झालेल्या २५२१ सदनिकांकरिता म्हाडातर्फे बृहन्मुंबईतील ५८ बंद/आजारी गिरण्यांमधील शिल्लक गिरणी कामगार/वारसांकरिता प्रस्तावित सोडतीसाठी सहभागी करण्यात येणाऱ्या अर्जदारांची प्रारुप यादी म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.gov.in वर प्रसिध्द करण्यात आली होती. सदर यादीबाबत काही आक्षेप/हरकती असल्यास दिनांक २८/०४/२०२२ दिनांक २९/०४/२०२२ कार्यालयीन वेळेत उपमुख्य अधिकारी/ धापुप्र/गिरणी/मुंबई मंडळ, कक्ष क्र.२०४, पहिला मजला, गृहनिर्माण भवन, कलानगर,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१ येथे व्यक्तीश: कार्यालयामध्ये उपस्थित राहून व तसेच ई-मेल आय.डी. mhadamillworkerltr२०२१@gmail.com वर पुराव्या व ओळखपत्रासह लेखी निवेदन सादर करण्याबाबत आवाहन करण्यात आले होते.

त्याअनुषंगाने व्यक्तीश: कार्यालयामध्ये उपस्थित राहून व तसेच ई-मेल द्वारे प्राप्त झालेल्या आक्षेप/ हरकतींसह सादर केलेल्या पुराव्यानुसार प्रारुप यादीमध्ये योग्य त्या दुरुस्त्या करुन वरील २५२१ सदनिकांच्या संगणकीय सोडतीसाठी अंतिम यादी निश्चित करण्यात आली आहे. सदर अंतिम यादी म्हाडाचे संकेतस्थळ https://mhada.gov.in वर गिरणी निहाय प्रसिध्द करण्यात आली आहे.

ज्या गिरणी कामगार/वारसांची नावे सारखी आहेत परंतू गिरणी संकेत क्रमांक, जन्म तारीख, तिकिट क्रमांक, सेवा कालावधी, ESIC क्रमांक तसेच इत्यादी तपशील मिळता जुळता नाही, असे गिरणी कामगार/ वारस वेगवेगळे असल्याचे गृहित धरुन अशा अर्जदारांचा प्रस्तावित सोडतीच्या यादीमध्ये समावेश करण्यात आला आहे. असे गिरणी कामगार/ वारस सोडतीमध्ये यशस्वी झाल्यास व कागदपत्र पडताळणीवेळी अथवा भविष्यात सदनिका वितरणाच्या कोणत्याही टप्प्यामध्ये अशा गिरणी कामगार/ वारसांनी एकापेक्षा जास्त अर्ज केल्याचे निदर्शनास आल्यास दुबार/ तिबार अर्जांपैकी एक अर्ज रद्द करण्यात येईल. तसेच प्रसिध्द करण्यात येणाऱ्या अंतिम यादीवर आक्षेप/हरकतींचा विचार करण्यात येणार नाही. याची नोंद घ्यावी.

शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले निर्णय/ परिपत्रक/आदेशानूसार सोडतीमध्ये यशस्वी ठरलेल्या अर्जदारांची पात्र/ अपात्रता निश्चित करण्यात येवून नियमानुसार पुढील करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

( डॉ. योगेश म्हसे )
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ, मुंबई.